# पुणे महानगरपालिका

स्थायी समिती

सभा क्र.४५ सभा दि.०८/११/२०२४

कार्यपत्रिका क्र.३२ दि.०८/११/२०२४

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.८/११/२०२४ रोजी, दुपारी ४ : ०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस पुढील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा.डॉ.राजेन्द्र भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा.अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभियंता (पथ) |
| मा.युवराज देशमुख | – | अधीक्षक अभियंता |
| मा.जयंत भोसेकर | – | मा.सहा.महा.आयुक्त |
| मा.राजीव नंदकर | – | मा.उपायुक्त |
| श्रीमती योगिता भोसले | – | प्रभारी नगरसचिव |

**मा.प्रशासक –** सभेला सुरूवात करावी.

प्र.नगरसचिव–स्थायी समिती, नियमित कार्यपत्रिका क्र.३२ चे कामकाज सुरू करीत आहोत.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

विषय क्र.११६२

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/१०/२०२४ ते दि.३१/१०/२०२४ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/४५६६, दि.०५/११/२०२४ चे पत्र.

**मा.प्रशासक –** सदर अहवालाची नोंद घेण्यात येत आहे.

**निर्णय :– सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.**

संकीर्ण

विषय क्र.११६३

पुणे पेठ वडगांवशेरी स.नं. २९अ, सि.स.नं.२३९ येथील लोकमान्य टिळक इंग्लिश स्कूलकरीता जोडणारा रस्ता एम.आर.टी.पी. कलम २१० अन्वये ९ मी. अस्तित्वातील रस्त्यास १२ मी. रस्तारूंदी प्रमाणरेषा आखूण कायम करणेस व जाहीर प्रकटनाव्दारे नागरिकांच्या हरकती / सुचना मागविण्यासाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन/११०१, दि.१०/११/२०२४ चे पत्र.

**मा.प्रशासक –** सदर विषयाचा आचारसंहितेनंतर करावा.

**निर्णय :–** सदर विषयाचा आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होवून सभा समाप्त झाली.

**सही /– xxx**
**(योगिता भोसले)**
**प्र.नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(डॉ. राजेन्द्र भोसले )**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**